महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/गट क(तांत्रिक)/अंएभां/अनुकंपा/नियुक्ती/फ-७/ ८६१० /२२, दिनांक : २८/१२/२०२२

## कार्यालयीन आदेश

विषय :- अनुकंपा तत्वावर औषधनिर्माता (गट-क) या पदावर नियुक्तीबाबत.
श्री. अंबादास एकनाथ भांड

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग.शा.नि.क्र. अकंपा१२१७/ प्रक्र.१०२/ आठ, दिनांक २१ सप्टेंबर,२०१७
२. श्री अंबादास एकनाथ भांड यांचे दिनांक ०७.१२.२०२१

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीनुसार या संचालनालयाच्या स्तरावर ठेवण्यात आलेलया अनुकंपा नियुक्तीच्या सामाईक प्रतिक्षासूचीतून खालील उमेदवारांची त्यांच्या संदर्भ क्र. ०२ च्या अर्जाच्या अनुषंगाने अनुकंपा तत्वावर औषधनिर्माता, गट क (तांत्रिक) (वेतनश्रेणी रु S-१०: २९,२०० - ९२,३००/-) या पदावर त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या संस्थेमध्ये निव्वळ तापुरत्या स्वरुपात अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | ज्येष्ठाता क्रमांक | नियुक्ती प्रवर्ग | नियुक्ती पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री अंबादास एकनाथ भांड | ०३ | खुला | अतिविशेषोपचार रुग्णालय, औरंगाबाद |

## अटी व शर्ती

१. सदर नियुक्ती स्वीकारुन शासकीय सेवेत कार्यरत असतांना अन्य कोणत्याही आस्थापनेवर नियुक्ती स्वीकारता येणार नाही.

२. सदरहू नियुक्ती स्वीकारताना भारतीय राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेणे व त्याचे काटेकोरपणे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९,मध्ये अंतर्भूत असलेले तसेच शासनाने वेळोवेळी विहित/ सुधारीत केलेले सर्व नियम व शासन निर्णय आपणांवर बंधनकारक राहतील.

४. एक पत्नी/पती हयात असताना आपण दुसरे लग्न करु नये व तसे निदर्शनास आल्यास आपणास शासकीय सेवेकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

५. शासकीय नियमाप्रमाणे असलेली हिंदी व मराठी भाषा तसेच विभागीय सेवा प्रवेश प्रशिक्षण व तत्सम अन्य प्रशिक्षण व परीक्षा विहित मुदतीत पूर्ण करणे/उत्तीर्ण होणे आपणांवर बंधनकारक राहिल. याबाबत आपल्या आस्थापनेशी संपर्क साधून योग्य ती माहिती करुन् घेण्याची जबाबदारी आपली राहिल.

६. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९.०३.२००३ नुसार संगणक अर्हता (एमएस-सीआयटी) नियुक्ती दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत धारण करणे आवश्यक़ आहे

७. शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम करण्यासाठीच्या सन २००५ चा बदल्यांचा अधिनियम क्र.२१ मधील तरतूदी आपणांवर बंधनकारक आहेत. त्यानुसार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे त्यांच्या प्राधिकारात त्यांच्या अधिनस्त महाराष्ट्रातील कोणत्याही संस्थेमध्ये आपली बदली करु शकतील व त्या बदली आदेशाचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

८. शासकीय सेवेतून मुक्त व्हावयाचे असल्यास / राजीनामा द्यावयाचा असल्यास तशी लेखी पूर्वसूचना १ महिना आधि आपण शासनास देणे आवश्यक आहे. तशी पूर्व सूचना न दिल्यास १ महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम शासन तिजोरीत जमा करावी लागेल. अन्यथा सदर रक्कम आपणांकडील महसूली थकबाकी समजून योग्य त्या कायदेशीर मार्गाने वसूल करण्याचा अधिकारी शासनास राहिल.

९. आपणांस कर्तव्यावर रुज झाल्यानंतर ३ महिन्यांच्या आत संस्थाप्रमुखांनी निर्देशित केलेल्या संबंधित वैद्यकीय अधिक्षक किंवा तत्सम प्राधिका-याकडून आपण शासकीय सेवेकरीता शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असलयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. आपली नियुक्ती पुढील आदेशापर्यंत करण्यात आली आहे. तसेच,आपल्या पूर्वचरित्र विषयक पोलीस अहवालात आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास अगर सदर अहवाल असाधानकारक असल्यास आपणांस कोणतीही पूर्वसूचना न देता आपल्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील.

११. नियुक्ती स्विकारण्यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता/दैनंदिन भत्ता दिला जाणार नाही.

१२. महाराष्ट्र शासन वित्त् विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यासाठी जी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यात नमूद केलेल्या सर्व अटी आपणांस बंधनकारक राहतील.

१३. प्रस्तुत नियुक्ती प्रक्रियेदरम्यान आपण या कार्यालयास सादर केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे व अभिलेख यावरुन आपण या पदावर शासकीय सेवेत नियुक्तीकरिता पात्र असल्याचे आढळून येत असल्याने आपणांस सदर नियुक्ती देण्यात आलेली आहे. परतु,भविष्यात आपल्या अपत्रातेचे पुरावे प्राप्त झाल्यास सदरची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता रद्य करण्यात येतील. तसेच, आपण शासकीय सेवेत नियुक्ती मिळविण्यासाठी हेतूत :पुरस्पर खोटे दस्तऐवज सादर केल्याबाबत फौजदारी स्वरुपाच्या कारवाईसाठी पात्र ठराल.

१४. अधिष्ठाता यांना सूचित करण्यात येते की, संबंधित उमेदवारांची मुळ कागदपत्रे त्यांनी शैक्षणिक अर्हतेनुसार मागणी केलेल्या पदानुसार आहे का यांची पुनश्च पडताळणी करुन खातरजमा करावी.

१५. **औषधनिर्माता** पदावर सदर नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असून शासन धोरणानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळून आल्यास आपली नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकारी नियुक्ती प्राधिकारी यांना राहिल.

१६. आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे अन्यथा आपली नियुक्ती रद्य करण्यात येईल व या संदर्भात तदनंतर प्राप्त झालेली निवदने / शिफारशी स्वीकारल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

१७. आपणांस दिनांक २८ मार्च,२००५ रोजी त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे निदर्शनास आलयास आपणांस शासकीय सेवेकरीता अपात्र ठरविण्यात येऊन आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१८. आपण् कर्तव्यावर रुजू झाल्यानंतर आपणांस लागू असल्यास ६ महिन्यांच्या आत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

**डॉ. दिलीप म्हैसेकर**
**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रति,
श्री अंबादास एकनाथ भांड
रा.खांबे, ता. संगमनेर
जिल्हा अहमदनगर
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१. अधिष्ठाता, अतिविशेषोपचार रुग्णालय, औरंगाबाद
२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद
३. जिल्हा कोषागार अधिकारी , जिल्हा कोषागार कार्यालय, औरंगाबाद